# संस्कार मंदिर संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय वारजे पुणे– ५८.

## विद्यार्थी विकास मंडळ

## ‘‘मराठी भाषासंवर्धन पंधरवडा’’ अहवाल २०१८–२०१९

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन करण्यासाठी व तिचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याकरिता संस्कार मंदिर संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय वारजे व विद्यार्थी विकास मंडळातंर्गत १ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान ‘‘मराठी भाषासंवर्धन पंधरवडा’’ साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप भोईटे सर यांनी केले. या पंधरा दिवसांमध्ये महाविद्यालयामध्ये विविध क्रार्यकमांचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये मराठी विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र थोरात सरांनी व्याखान दिले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी काव्यवाचन, कथावाचन ठेवण्यात आले होते. याचसोबत इतर स्पर्धांही आयोजित करण्यात आल्या. ज्यामध्ये निबंधस्पर्धा, वादविवादस्पर्धा, अंताक्षरी ,कथाकथन व सोबतच भिलार या पुस्तकांच्या गावी सहलीचे आयोजन करण्यात आले.

मराठी भाषासंवर्धन पंधरवडा साजरा करित असताना महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकविद्यार्थी यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यामध्ये मराठी भाषा संवर्धन होण्याच्या बाजूने प्रयत्न करण्यात आले.

कार्यक्रमाचे नियोजन विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख डॉ. स्वाती जगताप, प्रा. कविता मुनेश्वर, प्रा. ललिता कानगुडे, मराठी विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र थोरात व प्रा. कसबेकर सर सर्व महाविद्यालयीन प्राध्यापक व कर्मचारी यांनी केले.